RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ९९] बुधवार, डिसेंबर १०, २०२५/अग्रहायण १९, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २२१**

**प्राधिकृत प्रकाशन**

### मुरबाड नगरपंचायत, मुरबाड, जिल्हा ठाणे

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये मुरबाड शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण.**

क्रमांक १३५/२०२५

ज्याअर्थी, मुरबाड नगरपंचायतीने, तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, चे कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम २३(१) मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, तयार करण्याचा इरादा ठराव क्र. १३८, दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ अन्वये जाहिर करून त्याबाबतची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, कोकण विभागीय पुरवणी भाग २ मध्ये दि. १४ ते २० डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतूदीस अनुसरून मुरबाड नगरपंचायतीने तिच्या अधिपत्याखालील क्षेत्रासाठी प्रारूप विकास योजना, मुरबाड तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे यांची " नगररचना अधिकारी " म्हणून आदेश क्र. ३१६ दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगररचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरित केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. १ दिनांक ९ डिसेंबर २०२५ पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये नागरिकांकडून सूचना/ हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, मुरबाड नगरपंचायत, मुरबाड, जि. ठाणे.

२. सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे.

उक्त प्रारूप विकास योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/ हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, मुरबाड नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून मुरबाड नगरपंचायतीच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**मनोज ज. म्हसे,**
मुख्याधिकारी,
मुरबाड नगरपंचायत, मुरबाड.

ठिकाण मुरबाड,
दिनांक ९ डिसेंबर २०२५.

**MURBAD NAGAR PANCHAYAT, MURBAD, DIST. THANE**

**Notice**

**Publication of Draft Development Plan of Murbad under Section 26 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

**No. 135/2025**

Whereas the Murbad Nagar Panchayat, *vide* Order No. 138 dated 23rd November 2023, had declared its intention to prepare a Draft Development Plan of Murbad for the area under its jurisdiction, as per the provision of Section 23(*1*) read with Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and notice to that effect is published in *Maharashtra Government Gazette*, Kokan Division Supplement Part 2 on dated 14th—20th December 2023 ;

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Nagar Panchayat *vide* Order No. 316 dated 21st February 2024 has appointed Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane as " Town Planning Officer " to prepare the said Draft Development Plan of Murbad for the said area ;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has prepared the Draft Development Plan of Murbad and has handed it over to the Murbad Nagar Panchayat on dated 4th December 2025 for publication under Section 26(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 01, dated 9th December 2025 to publish the Draft Development Plan of Murbad under Section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/objections from the public ;

Therefore, Murbad Nagar Panchayat hereby publishes the Draft Development Plan of Murbad along with the Report under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/ objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. The Chief Officer, Murbad Nagar Panchayat, Murbad.
2. Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief officer, Murbad Nagar Panchayat, Murbad within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette*. Suggestions/ objections received by the Nagar panchayat within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Murbad Nagar Panchayat.

MANOJ J. MHASE,
Chief Officer,
Murbad Nagar Panchayat, Murbad.

Place Murbad,
Date 9th December 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.